# Newspaper: Loksatta
# Article date: 20th July, 2023

# Article about ‘Blood donation camp by Team Enigma’



लोकसत्ता [मुंबई]

कॉलेजच्या कट्ट्यावर

## सामाजिक भान जपणारा ‘एनिग्मा’

**मुंबई :** आंतरमहाविद्यालयीन महोत्सव म्हणजे तरुणाईच्या जिव्हाळ्याचा विषय. साहित्य कला, ललित कला, सादरीकरण कला आणि खेळ या क्षेत्रांतील विविध स्पर्धांची मेजवानी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होते. मात्र या महोत्सवांच्या माध्यमातून केवळ स्पर्धांचे आयोजन न करता विद्यार्थ्यांकडून सामाजिक भानही जपले जाते.

माटुंग्यातील पोदार महाविद्यालयातर्फे दरवर्षी ‘एनिग्मा’ आंतरमहाविद्यालयीन महोत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाच्या



महोत्सवाची सुरुवात सामाजिक उपक्रमाने झाली आहे. नुकतेच एनिग्मा महोत्सवाअंतर्गत पोदार महाविद्यालयात शीव रुग्णालयाच्या सहकार्याने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये ५० हून अधिक जणांनी सहभाग घेतला होता.

जून महिन्यात ‘बीच प्लिज’ संस्थेच्या सहकार्याने माहीम कॉजवे येथे पार पडलेल्या ‘बीच क्लिन-अप’ उपक्रमात विद्यार्थ्यांसह १०० हून अधिक जण सहभागी झाले होते. यावेळी मिठी नदीच्या किनाऱ्याची स्वच्छता करण्यात आली. ‘एनिग्मा महोत्सवात आम्ही कलात्मक स्पर्धांसह सामाजिक भान जपणारे उपक्रमही राबवित असतो.

यंदा एनिग्मा महोत्सव हा १ ते ३ सप्टेंबर या कालावधीत रंगणार आहे. यंदाच्या एनिग्माची मुख्य संकल्पना आणि सविस्तर वेळापत्रक हे लवकरच जाहीर करण्यात येईल’, असे एनिग्मा महोत्सवाची सचिव श्रुती तांबे हिने सांगितले. सदर महोत्सवाबाबतची अधिक माहिती @podarenigmaofficial या इंस्टाग्राम अकाउंटवर उपलब्ध आहे.